# दिनांक ०५.०५.२०१५ रोजी तहकुब होवून दिनांक ०८.०५.२०१५ रोजी झालेल्या ४६ व्या अर्थ समिती मासीक सभेचा कार्यवृत्तांत

## भाग पहिला

आजच्या अर्थ समितीस उपस्थित असलेले मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती व सदस्य, खातेप्रमुख व कर्मचारी यांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी स्वागत करुन मा.उपाध्यक्ष यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत आली.

विषय क्र.1 – मागील सभा दिनांक 09.04.2015 रोजी घेण्यात आलेल्या वित्त् समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणेत आला.

विषय क्र. 2 व 3- शासनाकडील महत्त्वाचे शासन निर्णय व पत्रांचे वाचन करणेबाबत व माहे मार्च 2015 चा सर्व खात्यांचा योजनानिहाय व खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणेबाबत विषय सादर केला असता खातेनिहाय माहिती खालीलप्रमाणे देण्यात आली.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** प्रत्येक खातेप्रमुखांनी स्वीय निधीमधील अखर्चित रकमेची माहिती दयावी.

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** स्वीय निधीमधील वेतन धरुन ३५ लक्ष शिल्लक रक्कम आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** ३१ मार्च पर्यंत रक्कम खर्च झालेली नसेल तर पुढील सन २०१५-१६ चे सुधारित बजेट करताना वाढ होणे आवश्यक आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** आरोग्य विभागाकडील रिक्त पदे कधी भरणेत येणार आहेत.

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** निवड मंडळाने दिलेल्या निर्देशा नुसार नेमणूक देण्यात आलेली आहे. आता फक्त मराठा व मुस्लिम आरक्षणाचे आदेश प्रलंबित आहेत.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** आरोग्य विभागात ए.एन.एम.ची पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत.त्या बाबत आपल्या विभागाने कोणती कार्यवाही केलेली आहे.

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** ४५० ए.एन.एम.ची पदे मंजूर असून ५२ रिक्त आहेत पैकी २२ आदेश दिलेले असून ३० पदे राहिलेली आहेत.

**श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** खातेप्रमुख तसलमात, प्रेसची थकबाकी याबाबत देखील सभेमध्ये सर्व खाते प्रमुखांनी आढावा देणेत यावा.

**मा.सौ.सावंत,सदस्या :-** प्राथमिक आरोग्य केंद्र कडील ड्रायव्हरचे पगार देण्यात आलेले नाहीत.

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** याबाबत कार्यवाही करीत आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** आरोग्य विभागाच्या जुन्या गाडया पी.ए.सी.मध्ये पडून आहेत.

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** जुन्या गाडयांच्या बाबतीत शासनाला प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे. त्यांचे निर्लेखन करुन निधी शासनाला भरावा लागणार आहे. तसेच प्रसुती वेळी मातेचा मृत्यू झाला तर तिला मदत मिळावी म्हणून जि.प.सभेमध्ये ठराव झालेला आहे. तसेच सोनाग्राफी सेंटरवर नियंत्रण ठेवणेसाठी साईलेंट ऑब्जरव्हर सिस्टीम बसविणेचा ठराव करणेत आलेला आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथ.) :-** स्वीय निधीमधील ९ लाख ७ हजार निधी शिल्लक आहे.

**मा.श्री.भाऊसाहेब पाटील,सदस्य :-** मिरज सिव्हील हॉस्पीटल मध्ये रुग्णांना योग्य प्रकारे उपचार दिले जात नाही उपचारामध्ये हेळसांडपणा केला जातो याबाबत संबधीत हॉस्पीटलला कळविणेत यावे.

**मा.श्री.लिंबाजी पाटील,उपाध्यक्ष तथा सभापती :-** आरोग्य समितीमध्ये याबाबत ठराव घेवून मिरज सिव्हील हॉस्पीटलला कळविणेत यावा.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** ज्या ठिकाणी सर्व शिक्षा अभियान मधून शाळा बांधकाम केलेल्या आहेत तरीही जि.प.शाळा भाडयांने खोल्या घेवून भरविल्या जात आहेत.याचा अहवाल घेणेत यावा. जिल्हास्तरावरुन जे साहित्य शाळेला दिले जाते त्याची नोंद शाळेच्या डेडस्टॉक रजिस्टरला असणे आवश्यक आहे. ३१ मे रोजी सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांची पेन्शन प्रकरणे कॅम्प चे आयोजन करुन निकाली काढण्यात यावेत. तसेच गेली दोन महिने झाली शिक्षकांचे पगार झालेले नाहीत.

**शिक्षणाधिकारी (प्राथ.) :-** शिक्षकांचे पगार सोमवार पर्यंत होणार आहेत.

**कार्यकारी अभियंता (छोपावि) :-** यांनी आपल्या विभागाकडील आढावा सादर केला.

**कृषी विकास अधिकारी :-** स्वीय निधी मधील ३ लाख भिलवडी नर्सरी वगळता इतर सर्व खर्च झालेला आहे. सन २०१५-१६ साठी ताडपद्री ४० लाख, चापकटर-४० लाख, बॅटरी स्प्रे पंप - २० लाख ३ व ५ एच पी - ५० लाख तरतूदीची मागणी केलेली आहे.

**मा. मा.श्री.भाऊसाहेब पाटील,सदस्य :-** ताडपदरी चांगल्या दर्जाची घेणेत यावी.

**कृषी विकास अधिकारी :-** ताडपदरी प्लॅास्टीकची चांगल्या दर्जाची आपण घेणार आहोत.

**मा.श्री.भाऊसाहेब पाटील,सदस्य :-** मोटारी चांगल्या दर्जाच्या व मोठया प्रमाणात खरेदी करुन सर्व सदस्यांच्या शिफारशीने लाभार्थ्यांना साहित्य समान वाटप करणेत यावे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** साहित्य खरेदी करीत असताना आर.सी.ने खरेदी न करता टेंडर करणेत यावे. पुरवठादाराला आदेश देताना त्यांची साहित्यांचा दर्जा पाहणी करणेत यावा.

**कृषी विकास अधिकारी :-** साहित्यांची खरेदी आर.सी.ने करणेबाबत शासन निर्णय झालेला आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य** :- आर.सी.ने साहित्य खरेदी केले असता दर्जा चांगला असत नाही. दर्जा पाहणी करणेसाठी पुरवठादाराला बोलविणेत यावे. अथवा ज्या साहित्यांची आर.सी. उपलब्ध आहे अशा साहित्यावर स्वीय निधीमधून तरतूद करणेत येवू नये.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी** :- स्वीय निधीमधील २.५० लाख शिल्लक आहेत. तसेच आकस्मिक घटनेसाठी निधी वाढवून देणेची आवश्यकता आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य** :- गोठा जळीत प्रकरणे उपलब्ध निधी मधून तात्काळ निकाली काढणेत यावेत. येतगांव येथे ६ शेळ्या मरण पावल्या आहेत याबाबत पाहणी करणेत यावी. लसीकरणांची खरेदी तात्काळ करणेत यावी.

**समाजकल्याण अधिकारी** :- यांनी मार्च २०१५ अखेर योजनानिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये मुख्यत्वे, करुन वसंत घरकुल, मागासवर्गीय वस्तीगृह आर्थिक सहाय्य, प्रचार व प्रसिध्दी, अपंग घरकुल, अपंगांना स्वयंरोजगार सहाय्य इत्यांदी आढावा देणेत आला. तसेच स्वीय निधीमधील ३९ लाख २५ हजार ४३९ निधी शिल्लक असल्यांचे सांगितले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) :- स्वीय निधीमधील १४ लाख ४५ हजार शिल्लक आहेत.

**मा.श्री.तानाजी यमगर,सदस्य** :- सायकल खरेदी करुन वाटप करणेत आले आहे का?

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) :- सायकलीबाबत आदेशानुसार पुरवठा करणेत आलेला आहे त्यांचे वाटप करणेचे आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य** :- एन.आर.एच.एम.कडील रिक्त पदे भरणेबाबत परवानगी आहे का?

**एन.आर.एच.एम (प्रतिनिधी)** :- या विभागाकडील पदे भरणेबाबत आपण कळविले आहे मात्र अद्याप निर्णय झालेला नाही.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य** :- जि.प.मुद्रणालय कडील थकबाकी व खातेप्रमुख तसलमात याबाबत खातेप्रमुख आढावा घेवून वसुली होणेबाबत सूचना देणेत याव्यात. तसेच यशवंत घरकुल योजना व केश कर्तनालय खुर्ची योजना बाबतची तरतूद ग्रामपंचायत विभागा ऐवजी अर्थ विभागाकडे योजना सोपविणेत येत आहे

**प्र. मुख्य लेखा व वित्त अधिकारी** :- सर्व खाते प्रमुखांकडील जि.प.मुद्रणालयाची थकबाकी व तसलमात यांचा आढावा घेतला. वित्त विभागमध्ये कार्यान्वीन यंत्रणा नसलयाने वित्त विभागा मार्फत कोणतीही योजना राबविता येऊ शकत नसलयाने ग्राम पंचायत विभागानेच ही योजना राबविणेत उचित राहिल.

**यानंतर मा.सभापती यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावरती ठराव करणेत आले.**

**विषय क्रं. ४:** सन २०१५-२०१६ मध्ये महिला व बालकल्याण समितीसाठी जि.प. स्वीयनिधी तून मुळ तरतूद र.रु. ८९,०७,९००/- मधून शासन निर्णय दि.२४ जानेवारी २०१४ नुसार गट अ च्या प्रशिक्षण सक्षमीकरणाच्या योजना (वस्तू खरेदीच्या योजना) घेणेबाबत विचार करणे.सदर विषयावर सविस्तर चर्चा होवून वस्तू खरेदीची योजना घेणे बाबत मान्यता देणेत यावी.

**विषय क्रं. ५:** पंचायत राज संस्थांच्या बळकटीकरणासाठी केंद्र पुरस्कृत १३ व्या वित्त आयोगाचे जिल्हा परिषदेकडील (जि.प.हिस्सा) निधी र.रु. २,२८,९४,९७४/- खर्चाबाबत चर्चा करुन व अर्थ समितीची शिफारस घेवून विषय जि.प.सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेस पाठविणे.सदर विषयावरती सविसतर चर्चा होवून १३ वा वित्त आयोगाचा निधी खर्च करणेस जि.प.सभेची मंजूरीसाठी शिफारस करण्यात आली.

यानंतर मा.सदस्य श्री.तानाजी यमगर यांनी मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती इतर उपस्थित सन्मा.सभापती, सन्मा. सदस्य , अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती यांचे वतीने आभार मानले व ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पारपाडले बददल सर्वांचे पुन:श्च एकदा आभार मानुन सभा संपलेचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| श्रीम.रुपाली कोळी | मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील |
| प्र. मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा | सभापती अर्थ समिती |
| सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली. | जिल्हा परिषद सांगली. |

# भाग दुसरा

## दिनांक ०५.०५.२०१५ रोजी तहकुब होवून दिनांक ०८.०५.२०१५ रोजी झालेल्या ४६ व्या अर्थ समिती मासीक सभेचा कार्यवृत्तांत

**विषय क्र.१** :- दि.०८.०५.२०१५ रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणे.
**ठराव क्र. ३०६:** दि. ०८.०५.२०१५ रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणेत आला. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री. भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य
अनुमोदक : मा.श्री.दिलीप दत्तु बुरसे सदस्य.

**विषय क्र.२** :- शासना कडील महत्वाचे शासननिर्णय व पत्राचे वाचन करणे.
**ठराव क्र.३०७:-** शासना कडील महत्वाचे शासननिर्णय व पत्राचे वाचन करणेत आले. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री. भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
अनुमोदक : मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्या.

**विषय क्र.३:** माहे मार्च २०१५ च्या सर्व खात्यांचा योजनानिहाय खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणे.
**ठराव क्र.३०८:** माहे मार्च २०१५ चा सर्व खात्यांचा योजनानिहाय खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणेत आला. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक:मा.श्री.दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य.
अनुमोदक मा.श्री.दिलीप दत्तु बुरसे सदस्य.

**यानंतर मा.सभापती यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावरती ठराव करणेत आले.**

**विषय क्रं. ४ :** सन २०१५-२०१६ मध्ये महिला व बालकल्याण समितीसाठी जि.प. स्वीयनिधी तून मुळ तरतूद र.रु. ८९,०७,९००/- मधून शासन निर्णय दि.२४ जानेवारी २०१४ नुसार गट अ च्या प्रशिक्षण सक्षमीकरणाच्या योजना (वस्तू खरेदीच्या योजना) घेणेबाबत विचार करणे.

**ठराव क्र.३०९:** सन २०१५-२०१६ मध्ये महिला व बालकल्याण समितीसाठी जि.प. स्वीयनिधी तून मुळ तरतूद र.रु. ८९,०७,९००/- मधून शासन निर्णय दि.२४ जानेवारी २०१४ नुसार गट अ च्या प्रशिक्षण सक्षमीकरणाच्या योजना (वस्तू खरेदीच्या योजना) घेणेबाबत विचार करणे.ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री. भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
अनुमोदक मा.श्री सुरेश गणपतराव मोहितेपाटील, सदस्य.

**विषय क्रं. ५ :** पंचायत राज संस्थांच्या बळकटीकरणासाठी केंद्र पुरस्कृत १३ व्या वित्त आयोगाचे जिल्हा परिषदेकडील (जि.प.हिस्सा) निधी र.रु. २,२८,९४,९७४/- खर्चाबाबत चर्चा करुन व अर्थ समितीची शिफारस घेवून विषय जि.प.सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेस पाठविणे.

**ठराव क्र.३१०:** पंचायत राज संस्थांच्या बळकटीकरणासाठी केंद्र पुरस्कृत १३ व्या वित्त आयोगाचे जिल्हा परिषदेकडील (जि.प.हिस्सा) निधी र.रु. २,२८,९४,९७४/- खर्चाबाबत चर्चा करुन व अर्थ समितीची शिफारस घेवून विषय जि.प.सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेस पाठविणे बाबत ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

सुचक:मा.श्री.दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य.
अनुमोदक मा.श्री सुरेश गणपतराव मोहितेपाटील, सदस्य.

यानंतर मा.सदस्य श्री.तानाजी यमगर यांनी मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती इतर उपस्थित सन्मा.सभापती, सन्मा. सदस्य , अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती यांचे वतीने आभार मानले व ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पारपाडले बददल सर्वांचे पुन:श्च एकदा आभार मानुन सभा संपलेचे जाहिर केले.

श्रीम.रुपाली कोळी
**प्र. मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा**
**सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली.**

मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील
**सभापती अर्थ समिती**
**जिल्हा परिषद सांगली.**